admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

संकेतस्थळ : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४१८/9388

दि. १२ जून,२०१८

## प रि प त्र क

**विषयः- शासकीय / अनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये समुपदेशन केंद्र सुरु करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठांमधील बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) हया व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षासाठीची सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया दि. ११ जून,२०१८ पासून सुरू झालेली आहे. सदरची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे. यासाठी खालील तीन संकेतस्थळे कार्यरत आहेत.

(१) http://www.dtemaharashtra.gov.in

(२) http://www.mcaer.org

(३) maha-agriadmission.in .

उक्त सात अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी चालू शैक्षणिक वर्षापासून प्रथमच सामायिक प्रवेश परीक्षा अनिवार्य करण्यात आलेली असून इ. १२ वी (विज्ञान) व सामायिक प्रवेश परीक्षेतील गुण आणि अधिभार यांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता निश्चित होणार आहे.

प्रवेशोच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करतांना, संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती भरणे, शैक्षणिक माहिती भरणे, मूळ कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे, विविध प्रवर्गाकरिता अनिवार्य असलेल्या कागदपत्रांची माहिती देणे, अधिभाराकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांची माहिती देणे इत्यादी बाबींसंदर्भात उमेदवार व पालकांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

admn 18-19

या पार्श्वभूमीवर कृषी विद्यापीठांतर्गत वरील विद्याशाखांच्या सर्व शासकीय / अनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालयांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये समुपदेशन केंद्र सुरु करावीत. या केंद्रामध्ये इंटरनेट सुविधेसह संगणक उपलब्ध करून द्यावीत. याचबरोबर प्रवेशोच्छुक उमेदवारांना ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्यासही मदत करावी.

**(रविंद्र जगताप) भा प्र से**
**महासंचालक**

प्रति,

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) अभ्यासक्रमाची सर्व शासकीय / अनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालये.

प्रतः-

कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रकानुसार कृषी विद्यापीठांतर्गत सर्व शासकीय / कायम विना अनुदानित महाविद्यालयांना आपल्यास्तरावरून देखील सूचित करण्यात यावे.